# मिरा भाईंदर महानगरपालिका

**सामान्य प्रशासन विभाग**

मुख्यालय, १ला मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)

दूरध्वनी क्र.०२२-२८१९२८२८ ई-मेल आयडी gad@mbmc.gov.in


25 वर्षे विकासाची

"माझे शहर, माझा अभिमान"

जा.क्र. मनपा/ सा.प्र.वि. / ६५० /२०२५-२६ दि. ०५/०३/२०२६

## परिपत्रक

**विषय:-** मिरा भाईंदर महानगरपालिकेचे "रौप्य महोत्सवी वर्धापन वर्ष" निमित्त शासकीय कार्यक्रम व शासकीय पत्रव्यवहारावर बोधचिन्ह (Logo) व टॅगलाईन वापरण्याबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थापना दि.२८ फेब्रुवारी, २००२ रोजी झाली. माहे-फेब्रुवारी २०२६ ते माहे-फेब्रुवारी २७ हा कालावधी रौप्य महोत्सवी वर्ष म्हणून साजरा करण्याचा निर्णय महानगरपालिकेने घेतला आहे.

त्या अनुषंगाने दि.२८ फेब्रुवारी, २०२६ रोजी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करुन रौप्य महोत्सवी वर्ष साजरे करण्यास सुरुवात करण्यात आली आहे. सदर कार्यक्रमा दरम्यान मान्यवरांच्या हस्ते रौप्य महोत्सवी वर्धापन वर्षाचे "माझे शहर, माझा अभिमान" या टॅगलाईनसह बोधचिन्हाचे (Logo) अनावरण करुन प्रसिध्द करण्यात आले आहे.

महानगरपालिकेच्या माध्यमातून वर्षभर आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमांच्या प्रचार/प्रसिध्दीत तसेच दैनंदिन कार्यालयीन आणि शासकीय पत्रव्यवहारात सदर **बोधचिन्ह (Logo) व "माझे शहर, माझा अभिमान" या टॅगलाईन** चा वापर कटाक्षाने करण्यात यावा. सदर बाब आपले अधिनस्त विभाग/कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून त्याप्रमाणे कार्यवाही करण्याच्या दृष्टीने योग्य त्या सूचना प्रसारीत कराव्यात.

**सोबत:-** बोधचिन्ह (सॉफ्ट कॉपी)

**(राधाबिनोद अ. शर्मा,** भा.प्र.से.)<br>
आयुक्त तथा प्रशासक<br>
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रति,**<br>
**सर्व खातेप्रमुख/विभागप्रमुख**<br>
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रत:- माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.**

1. मा. महापौर यांचे स्विय सहाय्यक
2. मा. उप-महापौर यांचे स्विय सहाय्यक
3. मा. सभापती, स्थायी समिती यांचे स्विय सहाय्यक
4. मा. सभापती, महिला व बाल कल्याण समिती यांचे स्विय सहाय्यक
5. मा. उपसभापती, महिला व बाल कल्याण समिती यांचे स्विय सहाय्यक
6. मा. अध्यक्ष, रौप्य महोत्सव वर्ष समिती